नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक ११/०२/२०२५ (मंगळवार) सकाळ**

---

## अवैधरित्या रेतीची चोरटी वाहतुक करणाऱ्या आरोपीतांविरूध्द कारवाई
## ५ आरोपीतांवर गुन्हा नोंद, ८१ लाख १० हजारांचा मुददेमाल जप्त

**पोलीस स्टेशन भिवापुर** :—दिनांक ०९/०२/२५ रोजी भिवापुर पोलीस हददीत पेट्रलिंग करीत असतांना पोलीसांना गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की निलज पवनी कडुन भिवापुर मार्गे उमरेड नागपुर ला जाणाऱ्या ३ टिप्परमध्ये अवैधरित्या विनापरवाना रेतीची चोरटी वाहतुक होत आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीसांनी समर्थ पेट्रोलपंप येथे नाकाबंदी केली असता १) १२ चक्का टिप्पर क्र. एम एच ४९ बी झेड ०९९३ ला थांबवुन चालकास त्याने नाव विचारले असता त्याने **अरविंद जित्रुजी तोडासे वय ३९ वर्ष, रा. चांपा उमरेड जि नागपुर** असे सांगितले. चालकाला परवान्याबाबत विचारपुस केली असता त्याने कोणताही परवाना नसल्याबाबत सांगितले तसेच रेतीची वाहतुक वाहन मालक आरोपी **नितीन भउरावजी बानकर रा. वकिल पेट रेशिमबाग नागपूर** यांच्या सांगण्यावरून करीत असल्याबाबत सांगितले. २) १२ चक्का टिप्पर क्र. एम एच ४० सी टी ९२२० ला थांबवुन चालकास त्याने नाव विचारले असता त्याने **दिपक सूभाषराव पाठक वय ३३ वर्ष, रा. चांपा उमरेड जि नागपुर** असे सांगितले. चालकाला परवान्याबाबत विचारपुस केली असता त्याने कोणताही परवाना नसल्याबाबत सांगितले तसेच रेतीची वाहतुक वाहन मालक आरोपी **प्रमोद हरीभाउ वैघ्य रा,शिवांगीनगर हूडकेश्वर** रोड नागपूर. यांच्या सांगण्यावरून करीत असल्याबाबत सांगितले. ३) १० चक्का टिप्पर क्र. एम एच ४० सी एम ८९९३ ला थांबवुन चालकास त्याने नाव विचारले असता त्याने **मारोती रामकृष्ण मळावी वय ३३ वर्ष, रा. नवेगाव पाचगाव नागपूर** असे सांगितले चालकाला परवान्याबाबत विचारपुस केली असता त्याने कोणताही परवाना नसल्याबाबत सांगितले तसेच सदर वाहन त्याच्याच मालकीचे असल्याबाबत सांगितले.वरील चालक आरोपीतांच्या ताब्यातुन ३ टिप्पर किमती ८०,००,०००/— रूपये व त्यामध्ये २२ ब्रास

रेती अंदाजे किमती १,१०,०००/— रूपये असा एकुण **८१,१०,०००/—** रूपयाचा मुददेमाल जप्त करण्यात आला आहे.

**वरील ५ आरोपीतां विरूध्द कलम ३०३(२)भा.न्या.सं सहकलम ४८(७), ४८(८) महाराष्ट्र जमीन महसूल संहिता सह कलम ४,२१ खाण खनिज अधिनियमअन्वये** सहकलम ३ सार्वजनिकसंपत्ती नुकसान प्रतिबंधक अधि. १९८४ सहकलम १५ पर्यावरण संरक्षण अधिनियतम अन्वये **गुन्हा दाखल करण्यात आला आहे.**




**अवैधरित्या रेतीची चोरटी वाहतुक करणाऱ्या आरोपीतांविरूध्द गुन्हा नोंद उपविभागिय पोलीस अधिकारी ,कार्यालय कन्हान यांची कामगिरी**

दिनांक ११/०२/२०२५ रोजी श्री संतोष गायकवाड, उप विभागीय पोलीस अधीकारी कन्हान हे खापरखेडा पोलीस स्टेशन हद्दीत पेट्रोलिंग करीत असतांनाएक १० चक्का ट्रक क्र. एम एच ४० सी एम ४८४८ हा भानेगाव कडुन खापरखेडा कडे येंताना दिसला त्यास थांबवून ट्रक ची पाहणी केली असता सदर ट्रक मध्ये अंदाजे ०५ ब्रास रेती मीळून आली. ट्रक चालक अनुजकुमार लल्लन सुर्यवंशी, वय २७ रा. वार्ड क्र ४ वलनी ता सावनेर याला परवान्याबाबत विचारपुस केली असता त्याने कोणताही परवाना नसल्याबाबत सांगितले. ट्रक मालकाबाबत विचारपुस केली असता त्याने जावेद, रा वलनी ता सावनरे असे सांगितले. पोलीसांनी पंचासमक्ष ट्रक मधुन १) ५ ब्रास रेती किंमती २५,०००/— रूपये आणि २) १०

चक्का ट्रक क्र. एम एच ४० सी एम ४८४८ किंमती १०,००,०००/— रूपये असा एकुण **१०,२५,०००/—रूपयाचा मुददेमाल जप्त केला आहे.**

_ट्रक **चालक** अनुजकुमार लल्लन सुर्यवंशी, वय २७ रा. वार्ड क्र ४ वलनी ता सावनेर आणि ट्रक मालक जावेद, रा वलनी ता सावनरे **याच्या विरूध्द कलम ३०३(२),३(५), ४९ भा. न्या. संहिता, बि एन एस. सहकलम ४८ (८) महा. जमीन महसुल अधिनीयम व कलम ४,२१ खान व खनीजे अधिनीयम,१९५७. कलम ३ सार्वजनीक संपत्ती नुकसान प्रतिबंधक अधिनियम,१९८४ सह कलम ५०,१७७ मोटर वाहन अधिनियम अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.**आरोपीला अटक करण्यात आली आहे.गुन्हयाचा पुढील तपास कन्हान पोलीस करीत आहे.




पोलीस माहिती कक्ष

नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर